# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०६ एप्रिल, २०१५ / चैत्र १६, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### मुंबई, ठाणे तसेच अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयात वस्तुंची जादा दराने केलेली खरेदी

**(१) * ३८२० श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे तसेच अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक रुग्णालये तसेच राज्य कामगार विमा विभागाच्या रुग्णालयात तांदूळ, गहू, साखर, गोडेतेल, मसाले तसेच अंडी, कोंबड्या आणि फळे यांची बाजारभावापेक्षा जास्त दराने खरेदी झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाची लुटमार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत मा.आरोग्य मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आरोग्य संचालक यांना निदेश दिले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती जणांवर कारवाई करण्यांत आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) याबाबत संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) चौकशी पूर्ण झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जायकवाडी धरणातून गोदावरी नदीपात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडणेबाबत**

**(२) * ३६७४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :**सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडण्याची मागणी शेतकरी, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीसाठी शेतकरी व ग्रामस्थ यांनी आंदोलनाची भुमिका घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोदावरी नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून नदीपात्रातील बॅरेजमध्ये पाणी सोडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, धरणातून पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणी आवश्यक असल्यामुळे पाणीपट्टी अथवा शुल्क आकारणी न करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) होय.
(३) औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील बॅरेजसाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांचे मागणीप्रमाणे आवश्यकतेनुसार पिण्यासाठी व जनावरांसाठी पाणी सोडण्यात आलेले आहे.
(४) शासनाच्या प्रचलित नियमानुसार पाणीपट्टी आकारणी केली जाते. पाणीपट्टी अथवा शुल्क आकारणी न करणे, ही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे उमरसरा (ता.जि.यवतमाळ) ग्रामपंचायत परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३) * ३४३६ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरसरा (ता.जि.यवतमाळ) ग्रामपंचायत परिसरातील निखील नगरातील रस्ते खड्डेमय झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर रस्त्यांची कामे तातडीने करणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) होय, पंचायत समिती यवतमाळ येथील विस्तार अधिकारी (पंचा) व शाखा अभियंता यांच्या मार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) मौजे उमरसरा (ता.जि.यवतमाळ) ग्रामपंचायत परिसरातील निखील नगर वॉर्ड क्र. १ चा रस्ता सुमारे २ कि.मी. परिसरामध्ये व्यापलेला आहे. हा विस्तीर्ण परिसर खड्डेमय झालेला होता. तथापि, सन २०१४-१५ मध्ये ग्रामपंचायत उमरसरा येथे लेखाशीर्ष २५१५१२३८, गावांतर्गत मुलभूत सुविधा या योजनेंतर्गत रस्ता खडीकरणाचे रु. ५ लक्ष चे काम मंजूर करण्यात आले असून सदर काम पूर्ण झालेले आहे. तसेच सदर कामावर ग्रामपंचायतीमार्फत रु. २.९० लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुरुड (जि.रायगड) येथील ग्रामीण मार्ग क्र. ७८ या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(४) * ३८८८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६६३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) शहरालगत १० कि.मी. अंतरावर असलेल्या ग्रामीण मार्ग क्र.७८ रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(२) सदर कामासाठी निधीची तरतूद करण्यात आली नसल्यास माहे मार्च, २०१५ अखेर सदर रस्त्याचे काम निधीच्या तरतूदीसह व आवश्यक त्या मान्यतेसह पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) मुरुड तालुक्यातील डोंगरी ते खोराबंदर हा मार्ग डांबरी पृष्ठभागाचा असून त्याची एकुण लांबी ०/३०० कि.मी. आहे. रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.७८ असा आहे. सदर रस्त्याच्या दुरूस्तीसाठी अंदाजे रु.५.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या रस्ता दुरुस्तीच्या कामास ३०५४ मार्ग व पुल लेखाशिर्षा अंतर्गत मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव जिल्हा परिषद रायगड कडून जिल्हा नियोजन समिती रायगड-अलिबागकडे सादर केलेल्या असून सन २०१४-१५ साठी निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध होताच जिल्हा परिषदेमार्फत सदरचे काम हाती घेण्यात येईल.

-----------------

**पुणे येथील महाराष्ट्र वैधानिक मंडळाचे मुख्यालय नाशिक येथे स्थलांतरीत करण्याबाबत**

**(५) * २८२२ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या विकासाच्या प्रादेशिक असमतोलाबाबत तोडगा काढण्यासाठी सध्या पुण्यात असलेले उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे मुख्यालय नाशिकला स्थलांतरीत करण्यांत यावे, अशी महत्वपुर्ण शिफारस अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंडळे यापुढे प्रादेशिक विकास मंडळे म्हणून ओळखली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २० वर्षापूर्वी स्थापित या मंडळाची पुनर्रचना करतांना त्यांच्या कार्यकक्षा बदलाव्यात तसेच प्रदेशाकरिता पंचवार्षिक विकास आराखडा तयार करणे, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तो अंमलात आणणे इत्यादी शिफारशी या अहवालातून करण्यांत आल्यात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक येथे उक्त वैधानिक मंडळाचे मुख्यालय कार्यान्वयीत होणेसंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे मुख्यालय पुणे येथे नसून, मुंबई येथे आहे. सदर विकास मंडळाने मुख्यालय नाशिक येके स्थलांतरीत करण्याबाबत डॉ. केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीने शिफारस केलेली आहे.

(२) हे खरे नाही. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे स्थापनेपासूनच प्रादेशिक विकास मंडळे म्हणून ओळखली जातात.

(३) होय.

(४) व (५) डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेले अहवालाबाबत राज्य शासनाचा अद्याप निर्णय झालेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरी ते वसंतनगर पादंण (ता.मानोरा, जि.वाशिम) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम**

**(६) * ३३३१ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी ते वसंतनगर पादंण (ता.मानोरा, जि.वाशिम) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मग्रारोहयो अंतर्गत उमरी खुर्द ते वसंतनगर कामाचे बिल (देयक) काढणाऱ्या शाखा अभियंता यांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणा-या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**माळशेज घाटातील अभयारण्याच्या हद्दीत सुरु असलेली बेकायदेशीर दगडखाण व डांबर प्लाण्टबाबत**

**(७) * ४२११ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय वन कायद्यानुसार अभयारण्य व वनखात्याच्या राखीव जंगलानजीक दगडखाण, गौणखनिज उत्खनन करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटाच्या पायथ्याशी अभयारण्याच्या हद्दीत झाडघर येथे मागील काही वर्षा पासून बेकायदेशीर दगडखाण सुरु असून वनखात्याचे या गंभीर गोष्टीस अभय असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी उपवनसंरक्षक, ठाणे, प्रधान सचिव, वनविभाग, मा.वनेमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे आदींकडे माहे नोव्हेंबर, २०१४ पूर्वी मागील १ वर्षापासून सातत्याने केलेल्या तक्रारीत स्पष्टपणे म्हटले आहे, हेही खरे आहे काय,

(३) माळशेज घाटात अभयारण्याच्या हद्दीतच झाडघर गावात दगडखाण व डांबर प्लाण्ट उल्हासनगर येथील ठेकेदाराने आदिवासी इसमाच्या नावाने सुरु केल्यामुळे या दगडखाणींच्या सुरुंग स्फोटामुळे व डांबर प्लाण्टच्या प्रदूषणामुळे वन्य प्राण्यांचे जीवनच धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अभयारण्य हद्दीत सुरु असलेली बेकायदेशीर दगडखाण व डांबर प्लाण्टच्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अभयारण्य व वनखात्याचे राखीव जंगलामध्ये केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय दगडखाण, गौणखनिज उत्खनन करता येत नाही. तसेच अभयारण्य क्षेत्राच्या बाह्यहद्दी पासून १० कि.मी. अंतरापर्यंतच्या (Eco Sensitive Zone) क्षेत्रातील खाणकाम / उत्खननाच्या प्रस्तावास जर पर्यावरण विभागाची मंजूरी आवश्यक असेल तर राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची विधीवत परवानगी घेणे देखील बंधनकारक आहे.

(२) सदर विषयाबाबत दैनिक सामना वृत्तपत्रात दिनांक २.१२.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, न्याहाडी यांचेमार्फत केलेल्या चौकशीमध्ये असे आढळून आले की, मौजे झाडघर, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील सर्व्हे नं. १४३ / ५ वरील ३.४५ हेक्टर आर क्षेत्रावर दगडखाण काढलेली होती. परंतु सद्यःस्थितीत तेथे कोणतेही उत्खनन चालू नसून उत्खननाचा साठादेखील आढळून आलेला नाही.

(३) मौजे झाडघर येथील सदरच्या दगडखाणीचे क्षेत्र भिमाशंकर अभयारण्य व हरिश्चंद्रगड-कळसूबाई अभयारण्याच्या संरक्षित क्षेत्राच्या सीमेपासून १० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे, त्यामुळे वन्य प्राण्यांचे जीवन धोक्यात आलेले आहे, हे खरे नाही.

(४) प्राप्त तक्रारीबाबत चौकशी करण्यात आली आहे.

(५) चौकशीमध्ये सदर दगडखाणीचे क्षेत्र भिमाशंकर अभयारण्य व हरिश्चंद्रगड-कळसूबाई अभयारण्याच्या संरक्षित क्षेत्राच्या सीमेपासून १० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्याचे व सदर दगडखाणीकरिता महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांच्याकडून Environmental Clearance मिळाल्याचे आढळून आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळु धरणाला परवानगी मिळण्यासाठी ८ ग्रामसभांचे जोडलेले बनावट ठराव**

**(८) * ४७३३ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळु धरणाला परवानगी मिळण्यासाठी ८ ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांचे बनावट ठराव जोडले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात काही सामाजिक संघटनांच्यावतीने टोकावडे पोलीस ठाण्यात दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) श्रमिक मुक्ती संघटनेच्या वतीने दिनांक २३/५/२०१३, २८/१२/२०१४ व दिनांक १/१/२०१५ रोजी पोलीस स्टेशन, टोकावडे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(३) उक्त प्रकरणी टोकावडे पोलीस ठाणे मार्फत तपास चालू आहे.

(४) तपासणी अद्यापी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे संबंधीतावर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवला नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत १५० प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(९) * ५१४२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत १५० प्राथमिक शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणी पासून वंचित असल्याने महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीने शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे आदेश दिनांक ३०.८.२०१४ अन्वये ३१५ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केलेली आहे. तसेच वरिष्ठ वेतनश्रेणीपासून वंचित असलेल्या उर्वरित प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परळी (जि.बीड) येथील शिशुगृहातील बालके गायब झाल्याबाबत**

**(१०) * ५२२७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.नेमीचंद दिपकचंद बहेरा शिशुगृह परळी (जि.बीड) येथे दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास बालकल्याण समितीच्या सदस्यांनी भेट दिली असता सहा बालके गायब असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिशुगृहातील सहा बालके संशयास्पदरितीने गायब झाल्याप्रकरणी शासकीय अधिकारी अथवा संस्थेने रितसर तक्रार नोंदविलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या बाल कल्याण विभागातील अधिकारी व शिशुगृह चालक यांच्या संगनमताने हा प्रकार घडला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) महाराष्ट्र मारवाडी फाऊंडेशन संचलित स्व.नेमीचंद बडेरा, शिशुगृह, परळी जि.बीड या संस्थेतील ६ बालके बाल कल्याण समितीने दत्तकासाठी मुक्त केलेली नसताना दत्तकेच्छुक पालकांना सांभाळण्यासाठी दिलेली होती.
(२) हे खरे नाही.
बाल कल्याण समिती, बीड यांनी संस्थेचे संचालक, अधिक्षक यांचेविरुध्द पोलिस स्टेशन परळी येथे भा.दं.वि. कलम ३६३ नुसार फिर्याद दिलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) संस्थेस देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द का करण्यात येऊ नये, अशा आशयाची संस्थेस आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आलेली आहे. संस्थेचा खुलासा प्राप्त होताच नियमानुसार संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दिवाळवाडी धरणाच्या कालव्याच्या दुरुस्तीबाबत**

**(११) * ५३७२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दिवाळवाडी धरणाच्या कालव्याची दुरुस्ती अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिक्षक अभियंता, कोकण पाटबंधारे महामंडळ, रत्नागिरी यांनी सन २००६ मध्ये कालव्यांची दुरुस्ती पूर्ण होऊन पाणी शेत जमिनीला देण्यात येत आहे असे नमूद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्याची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, डाव्या कालव्यावर विद्यानगरी येथे असलेले बांधकाम काढून टाकण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.

दि.२९ जुलै, १९९६ रोजी पावसाळ्यात धरणाच्या विमोचकास धोका निर्माण होऊन विमोचक पाईप फुटल्याने सन २००५ पर्यंत धरणाच्या दुरुस्ती अभावी, धरणात पाणीसाठा न केल्याने ९-१० वर्षे सिंचन बंद होते. कालवे कार्यान्वित नसल्याने अतिवृष्टीमुळे कालवे गाळाने भरलेले होते. धरण दुरुस्तीनंतर सन २००६-०७ मध्ये प्रथमच दुरूस्तीसाठी प्रामुख्याने पिकअप विअर मधील गाळ काढणे, कालव्यावरील झाडे-झुडपे तोडणे व पिकअप विअरला नवीन फळ्या बसविणे या बाबी करण्यात येवून कालव्यात पाणी सोडण्यात आले. तसेच, पुढे सन २००७-०८ ते २०१०-११ पर्यंत उजवा कालवा (२.११ कि.मी.) व डावा कालवा (३.३० कि.मी.) मधुन टप्प्या टप्प्याने यांत्रिकी विभागामार्फत कालवा स्वच्छता अभियानांतर्गत गाळ काढून सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले. कालव्याच्या उर्वरीत दुरूस्तीची कामे अनुदान उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) डाव्या कालव्यावरील विद्यानगरी येथील अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग (द.) रत्नागिरी यांनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावरील अतिक्रमण हटविणेबाबत

**(१२) * ५९९९ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर अतिक्रमण केले असल्याचे व जुन्या गावातील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेच्या बाजूला कत्तलखाने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार उक्त शाळेच्या मैदानावरील अतिक्रमण हटविणेबाबत व सदर कत्तलखाने हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद हायस्कुल, मुखेड या शाळेच्या मैदानावरील अतिक्रमण हटविण्याबाबत मुख्याध्यापकांमार्फत उप अभियंता, बांधकाम विभाग, मुखेड यांचेकडे व पोलीस स्टेशन मुखेड यांचेकडे लेखी तक्रार देण्यात आली आहे. तथापि, अतिक्रमणधारकांनी स्थानिक न्यायालयात याचिका दाखल केली असल्याने सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. याबाबत जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून न्यायालयीन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा ही भाडयाच्या इमारतीत भरत असून सदर शाळेच्या परिसरातील कत्तलखान्याचे अंतर शाळेपासून १६० ते १७० मीटर एवढे अंतर लांब आहे . याबाबत प्रशासनास कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याने कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथील सिमेंट नाला खोलीकरण व बांधकामात झालेला निधीचा अपहार**

**(१३) * ६१७३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथील सिमेंट नाला खोलीकरण व बांधकाम सुरु असून जामठी नाल्याचे खोदकाम केल्यानंतर त्या नाल्यात पुन्हा माती भरण्याचे काम येथील कृषी विभागाने करुन शासनाच्या निधीचा अपहार केल्याचे दिनांक २६ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही,

तथापि, यासंदर्भात वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती, त्यानुसार उपविभागीय अधिकारी (महसुल) यांनी फेब्रुवारी, २०१५ मध्ये पहाणी केली असता नाला सुस्थितीत असुन नाल्यामध्ये पाणी असल्याचे व नाल्यात माती भरलेली नसल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारळी (ता.पाटण, जि.सातारा) येथील धरण प्रकल्पातील पाणी स्थानिक शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(१४) * ६४६८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारळी (ता.पाटण, जि.सातारा) येथील धरण प्रकल्पातील पाण्यावर या भागातील धरणग्रस्तांचा आणि तेथील शेतकऱ्यांचा प्रथम हक्क असून या धरणातील पाणी तेथील शेतकऱ्यांच्या १०० % क्षेत्राला न देता ते बाहेरील तालुक्यांना देण्याचा निर्णय कृष्णा खोरे विकास महामंडळाने घेतला असून, राज्य शासनाने प्रथमत: तारळी नदीच्या दोन्ही तीरावरील ५० मीटर उंचीच्या वरील या विभागातील शेतकऱ्यांच्या क्षेत्राला पाणी देण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन त्याकरीता या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याकडे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) तारळी प्रकल्पाचे पाणी नियोजन मंजूर झालेले असून आता नवीन क्षेत्रास अतिरिक्त पाणी उपलब्ध नाही. तथापि मा. राज्यमंत्री महोदयांनी दि. ३०/०१/२०१५ रोजी प्रकल्पस्थळी भेट देवून तारळी नदीचे दोन्ही तीरावरील ५० मी. उंचीच्या वरील डोंगर पायथ्यापर्यंतच्या सिंचनापासून वंचित राहणा-या क्षेत्राचे सर्वेक्षण पूर्ण करुन ते भिजविण्याच्या दृष्टीकोनातून सुक्ष्म सिंचनासह विविध पर्यायांचा अभ्यास करुन अहवाल शासनास सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर अभ्यास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देवाचे गोठणे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत बंधा-याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(१५) * ६५३२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवाचे गोठणे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत बंधा-याची करण्यात आलेली कामे अतिशय निकृष्ट करण्यात येऊन या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू बंधा-याची कामे चांगल्या दर्जाची करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१६) * ६५७० श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरवस्था झाली असून बदलत्या वैद्यकीय तंत्रानुसार अत्याधुनिक साधनसामुग्री नसल्यामुळे येथील नागरीकांना दर्जेदार सुविधा मिळत नसल्याचे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत विविध शासकीय योजना, आरोग्य सेवा पोहचविण्यासाठी केंद्र व राज्यशासन बांधिल असूनही राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरावस्था होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रात मनुष्यबळ, आत्याधुनिक साधनसामग्री तसेच योग्य निधी पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही. सोलापूर जिल्हयात ७७ प्राथमिक आरोग्य केंद्र व ४३१ उपकेंद्र कार्यान्वित आहेत. ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ७४ प्राथमिक आरोग्य केंद्र स्वतःच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अत्यावश्यक साधन सामुग्री उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही रुग्णांची हेळसांड अथवा उपचाराअभावी गैरसोय झालेली नाही.

(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दारिद्रय रेषेखालील सुधारित यादींमध्ये सर्व गरीबांची नावे समाविष्ट करण्याबाबत**

**(१७) * ६५९० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रय रेषेखालील सुधारित यादींमध्ये सर्व गरीबांची नावे समाविष्ट करण्यात यावी या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्यांसाठी जळगाव येथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली श्रमिकांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढुन जिल्हाधिकारी,जळगांव यांना निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्याचे स्वरुप काय आहे व सदर मागण्या बाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय

(२) व (३) १. महागाई नुसार दारिद्रय रेषेची मर्यादा वार्षिक रु. ५०,०००/- उत्पन्न करा.

२. सर्व ग्रामीण व शहरी असंघटीत श्रमिकांना दारिद्रय रेषेखालील यादीत घाला.

३. अपात्र श्रीमंताची नावे यादीतून वगळा.

४. सर्व सरकारी योजनांचा लाभ गरीबांना द्या.

५. गाव पातळी व वार्ड पातळीवर गरीबांचे दावे व हरकती घेवून छाननीतून सुधारीत सर्व समावेशक बीपीएल यादी जाहिर करा.

राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंब निश्चित करण्याकरीता केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण - २०११ करण्यात आले असून प्रत्यक्ष सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. त्यानुसार जळगांव जिल्ह्यातील सर्वेक्षणांतर्गत प्राप्त माहितीची प्रारुप यादी दिनांक २५.०३.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून या माहिती संदर्भात दावे आक्षेप प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. सदरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परिपूर्ण माहितीचा अंतिम यादी केंद्र शासनास सादर करण्यात येत असून त्यानंतर केंद्र शासनाकडून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे निकष निश्चित होणार आहेत.

-----------------

**माण-खटाव तालुक्यातील उरमोडी मिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेचे काम करण्याबाबत**

**(१८) * ६६०७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण-खटाव तालुक्याचे पाणी प्रश्न सोडविण्यासाठी सुरु करण्यात आलेली उरमोडी मिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनांची कामे ब-याच वर्षापासून प्रलंबित असल्याने उक्त तालुक्यांना पाणीसंकटाला सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील सदर योजनांची प्रलंबित कामे त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) माण, खटाव या अवर्षणप्रवण तालुक्यातील सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने उरमोडी व जिहे कठापूर उपसा सिंचन योजना या प्रकल्पांची कामे हाती घेतली आहेत.

(२) व (३) उरमोडी प्रकल्पाची मान्यताप्राप्त व्दितीय सुप्रमा किंमत रुपये १३२४.१४ कोटी असून फेब्रुवारी, २०१५ अखेरील खर्च रु.८५७.९२ कोटी आहे. उरमोडी प्रकल्पाची प्रकल्पीय सिंचन क्षमता ४३,८७० हे. असून त्यापैकी जून २०१४ अखेर ७२९४ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. धरणाचे काम पूर्ण असून उरमोडी प्रकल्पांतर्गत असणाऱ्या उपसा सिंचन योजनेचे टप्पा क्र. १ व टप्पा क्र. २ अंशत: कार्यान्वित करण्यात आले आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार योजनेची उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेची मंजूर प्रशासकीय मान्यता किंमत रु. २६९.०७ कोटी असून फेब्रुवारी, २०१५ अखेरील खर्च रु.२९५.२७ कोटी आहे. या योजनेअंतर्गत बॅराज, पंपगृहे, ऊर्ध्वगामी नलिका व बोगदे यांची कामे अंशत: झाली आहेत. प्रकल्पाचा रु. ९८०.०७ कोटी किंमतीचा सुधारित प्रशासकीय प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**राज्यात अनेक डॉक्टर शासकीय नोकरी सोडून जात असल्याबाबत**

**(१९) * ३६५९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक डॉक्टर्स शासकीय सेवेत येताना केलेला करार मोडून नोकरी सोडून जात असल्यामुळे बाँडच्या रक्कमेत वाढ करण्याचा विचार शासन करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक डॉक्टर्स शासकीय सेवेचा फायदा घेऊन वेतनासोबत शासकीय सवलतीतून पदवीत्तर शिक्षण घेत असून सवलती पूर्ण होताच नोकरी सोडण्याचे प्रकारही करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे लक्षात घेऊन अशा अर्धवट नोकरी सोडणाऱ्या डॉक्टर्संना पूर्ण शासकीय सेवा करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) शासकीय सेवेत उच्च शिक्षण घेणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा तात्काळ भरणे संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शासकीय सवलतीतुन पदव्युत्तर अभ्यास पूर्ण करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विहीत मुदतीपुर्वी नोकरी सोडल्यास रु.५०,००,०००/- दंड रक्कमेची तरतुद आहे. तसेच पदव्युत्तर पदविकाधारक वैद्यकीय अधिकाऱ्यास ३ वेतनवाढी व पदव्युत्तर पदविधारक वैद्यकीय अधिकाऱ्यास ६ वेतनवाढी अनुज्ञेय आहेत. पदव्युत्तर पदविका/पदवी धारकास त्यांच्या अभ्यासक्रमानूसार प्राधान्याने नियुक्त्या दिल्या जातात.

(४) या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण विभागाकडील परंतू सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गतच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमधून भरण्यात येणाऱ्या ४३९ पदांपैकी ३४० पदे वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिनस्थ ठेवण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील १६ ग्रामपंचायतीच्या लेखा अहवालात घेतलेले आक्षेप**

**(२०) * ३४४१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील १६ ग्रामपंचायतीमधील लेखा अहवालात २२ हजार ९०५ आक्षेप घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ते (४) जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत एकूण १६ पंचायत समित्या असून एकूण १२१० ग्रामपंचायती आहेत. माहे डिसेंबर, २०१४ अखेर ग्रामपंचायत प्रलंबीत लेखा आक्षेप संख्या २८८१५ इतकी आहे. प्रलंबीत लेखा आक्षेपांचे अनुपालन तयार करुन ग्रामपंचायतीचे ठराव, पंचायत समितीचे ठरावासह पाठविण्याबाबत गट विकास अधिकारी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. पंचायत समितीकडून लेखा आक्षेपांचे अनुपालन प्राप्त झाल्यानंतर सदर परिच्छेद मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) यांना प्रलंबीत लेखा आक्षेपाचे अनुपालन त्वरीत आवश्यक त्या ठरावासह पंचायत समितीची मंजूरात घेवून पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे. तसेच गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या २००० लेखा आक्षेपांचे अनुपालन मंजूर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत लेखा आक्षेपांची पूर्तता करण्याबाबत गट विकास अधिकारी यांचेकडून नियमीत आढावा व पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) येथे कालबाह्य पोषण आहाराचे केलेले वाटप**

**(२१) * ३८६६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक बालविकास विभागातर्फे आयुक्तालयात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पोषण आहाराचे अंगणवाड्यांना वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) येथे माहे जुलै २०१४ मध्ये वा त्यादरम्यान अंगणवाड्यांना वाटप झालेला पोषण आहार हा कालबाह्य झाल्याचा प्रकार दि.१६ जूलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, कालबाह्य पोषण आहार वाटप करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर पोषण आहाराची पाकीटे कालबाह्य असल्याचे अंगणवाडी सेविकेच्या निदर्शनास आल्याने ते ताब्यात घेण्यास नकार दिला.

(३), (४) व (५) याबाबत महाड एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे, महाड-रायगड येथे दि.१७/०७/२०१४ प.नॉ.कॉ.रजि.नं.९४/२०१४ भदंविसं कलम २७३, ३४ अन्वये संबंधितांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आलेला असून कायदेशीर कारवाई पोलीसांकडून सुरू आहे.

-----------------

**सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील राखीव वनजमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२२) * ६०६७ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील राखीव वनक्षेत्रातील वनहद्दीच्या खुणा जेसीबी मशिनच्या सहाय्याने नष्ट करुन वनजमिनीवर अतिक्रमण केल्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम खात्यातील शाखा अभियंता यांना दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनजमिनीतील अतिक्रमणाप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे, सटाणा ता. बागलाण, जि.नाशिक येथील सटाणा परिमंडळात ब्राम्हणगांव नियतक्षेत्रातील, राखीव वन क्र. १९३, गट नं. ५० मौजे यशवंत नगर मधील वन जमिनीवर जेसीबी मशिनच्या सहाय्याने वनहद्दीच्या खुणा नष्ट करुन अतिक्रमण झाल्याचे दि. १२.१०.२०१४ रोजी आढळून आल्याने श्री. दिलीप काशिनाथ बच्छाव (शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग) यांचे विरुध्द वनपाल सटाणा यांनी प्रथम गुन्हा रिपोर्ट क्र २, दिनांक १२/१०/२०१४ रोजी जारी केला आहे. तसेच त्यांना दि. २३/१/२०१५ रोजी अटक करुन न्यायालयात हजर केले आहे.
(२) वनपाल सटाणा यांनी प्र.गु.रि.क्र. २/१२.१०.२०१४ अन्वये, भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ १(अ) (ड) (ह), कलम ५२(२), कलम ६३ (क), वनसंरक्षण अधिनियम, १९८० चे कलम २ व जैव विविधता अधिनियम, २००२ अंतर्गत श्री. दिलीप काशिनाथ बच्छाव (शाखा अभियंता, म.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. ४ कळवण कॅम्प, नाशिक याचे कार्यायल) यांचेवर गुन्हा जारी केला आहे. यात १ जेबीसी क्रमांक MH ०४ B ८९७६ हा जप्त केला असून याबाबत मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा व उपाविभागीय वन अधिकारी, मालेगांव यांना अहवाल सादर केला आहे. श्री.दिलीप काशिनाथ बच्छाव यांनी अटकपुर्व जामीनासाठी मा. सेशन कोर्ट मालगांव व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे केलेला अर्ज फेटाळण्यात आल्यामुळे दिनांक २३.१.२०१५ रोजी श्री. बच्छाव यांना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील हीवरा जिल्हा परिषद गटातील बारभाई तांडयाला जाण्यासाठी रस्ता नसल्याबाबत**

**(२३) * ३३३२ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील हीवरा जिल्हा परिषद गटातील बारभाई तांडयाला जाण्यासाठी रस्ता नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागाव तालुक्यात गुणवत्ता नियंत्रण कागदावरच गेल्या जात असल्यामुळे संपूर्ण महागाव तालुक्यातील रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील सवना-वाकोडी, मुडाणा-गौळ, बिजोरा-दगडथर, वडद-बेलदरी, मुडाणा-वडद, पिंपळगाव-भांब, अनंतवाडी-कोठा, हीवरा-बारभाई तांडा, पोखरी-कोणदरी, माळहिवरा-खडका-चिलगव्हाण सह तालुक्यातील अनेक रस्त्याची दुरवस्था झालेली असून या सर्व रस्त्यांची शासनामार्फत दुरुस्ती व देखभाल नियमित केली गेली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील रस्त्याची दुरुस्ती केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(५) अद्यापपर्यंत रस्ता दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रश्नांकीत बारभाई तांडा हे गाव लेवा ते बारभाई तांडा, ग्रामीण मार्ग ७९ या डांबरी रस्त्याने (पुलासह) जोडलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत रस्त्यांबाबत नमूद करण्यात येते की, १) **बिजोरा दगडथर रस्ता- (इ.जि.मा.१८७)** सदर रस्त्याची लांबी १०.०० कि.मी. आहे. त्यापैकी १.५० कि.मी. चे नुतनीकरण सन २०१३-१४ मध्ये तेराव्या वित्त आयोगामधुन करण्यात आले आहे. ०.५० कि.मी.ची दुरुस्ती सन २०१३-१४ मध्ये गट ब अंतर्गत करण्यात आली आहे. पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम २०१३-१४ अंतर्गत १.२० कि.मी.चे नुतनीकरणाचे काम प्रगतीत आहे. आदिवासी उपययोजना २०१४-१५ अंतर्गत १.०० कि.मी. चे नुतनीकरणाचे काम मंजुर आहे. **२) वडद बेलदरी रस्ता-** असा रस्ता अस्तीत्वात नाही. वडद हे गाव वडद-मडाणा या इ.जि.मा.१८६ ने जोडलेले आहे. या रस्त्याची लांबी ५.०० कि.मी. असून, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमधुन या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले असून सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे. बेलदरी हे गाव प्र.रा.मा.६ ला इ.जि.मा.१८९ ने जोडलेले आहे. या रस्त्याची लांबी ६.०० कि.मी. असून, सन २०१४-१५ मध्ये या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत डांबरीकरण करण्यात आले आहे. **३) मुडाणा वडद रस्ता (इ.जि.मा.१८६)-** सदर रस्त्याची एकूण लाबी ५.०० कि.मी. असून सन २०१०-११ मध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमधुन या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्यात आले असून सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे. **४) पिंपळगाव भांब रस्ता -** असा रस्ता अस्तित्वात नाही. पिंपळगाव हे गाव इ.जि.मा. १८६ ने रा.मा. ५१ ला जोडले आहे. या रस्त्याची लांबी २.०० कि.मी. आहे. पृष्ठभाग डांबरी असून रस्ता सुस्थितीत आहे. भांब हे गाव ग्रा.मा.१३१ ने रा.मा.५१ ला जोडले असून या रस्त्याची लांबी ०.४० कि.मी. आहे. पृष्ठभाग डांबरी आहे. या

रस्त्याचे नुतनीकरणाचे काम पुरहानी कार्यक्रम २०१३-१४ अंतर्गत मंजूर आहे. **५) अनंतवाडी कवठा रस्ता (ग्रा.मा.८९)-** सदर रस्त्याची लांबी १.८० कि.मी. असून १.५५ कि.मी. लांबीचे डांबरीकरण गट ब अंतर्गत २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये करण्यात आले आहे. उर्वरीत ०.२५ कि.मी. लांबीतील दुरुस्तीचे काम ३०५४ मार्ग व पुल सन २०१४-१५ मध्ये मंजूर आहे. **६) हीवरा ते बारभाई तांडा रस्ता -** हिवरा ते बारभाई तांडा अशी सलग लांबी अस्तित्वात नाही. हिव-या पासुन रा.मा. ६ मार्गाने १.०० कि.मी. अंतरावर राउतवाडी जोडरस्ता सुरु होतो. या रस्त्याची लांबी १.५० कि.मी. असून त्याचा क्रमांक ग्रा.मा.८१ आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी आहे. राउतवाडी ते बारभाई तांडा या रस्त्याची लांबी १.५० कि.मी असून त्याचा क्रमांक ग्रा.मा.८० आहे. त्याचा पृष्ठभाग खडीचा आहे.

**सवना वाकोडी, मुडाणा गौळ, पोखरी कोणदरी, माळहिवरा खडका चिलगव्हाण** हे रस्ते प्र.जि.मा.दर्जाचे असून सदर रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. उपलब्ध निधीनुसार दुरुस्तीची कामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाने सेस फंडातून निकृष्ट दर्जाचे भजनी साहित्य खरेदी केल्याबाबत

**(२४) * ५६०८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाने सेस फंडातून २० लाखांचे भजनी साहित्य खरेदी केले असून या खरेदी साहित्याचा दर्जा अतिशय निकृष्ट असल्याने साहित्य पुरवठादारास परत केले, मात्र त्यानंतर पुन्हा साहित्यच परत आले नसल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात सखोल चौकशी करुन संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामधील २०% सेस फंडातून रु.२०,००,०००/- चे भजनी साहित्य खरेदी करण्यात आले होते. सदर साहित्याचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यात किशोरवयीन मुलीकरीता देण्यात येणा-या पोषण आहारात झालेला गैरव्यवहार**

**(२५) * ५१६५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात १४ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींकरीता पोषण आहार म्हणून मटकी, चना, चवळी, तेल, मिरची इत्यादी निकृष्ठ दर्जाचे साहित्य पुरवून त्यात लाखो रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, व संबधीत कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही, तथापि, किशोरवयीन मुलींना सबला पोषण आहार योजनेअंतर्गत निकृष्ट आहाराचा पुरवठा होत असल्याबाबत श्री पंकज वि.वानखडे, अध्यक्ष, धामणगांव रेल्वे विधानसभा, युवक कॉग्रेस, मु.पो.विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे दि. २०/०२/२०१५ रोजी तक्रार केली आहे.

(२) होय, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद, अमरावती यांनी मेळघाट वगळता इतर १२ प्रकल्पांचे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना दि. २४/०२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष लाभार्थी तसेच अंगणवाडी सेविका यांचेकडे जाऊन याबाबत चौकशी केली असता अशी कोणत्याही प्रकारची तक्रार त्यांना आढळून आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडयातील मध्यम आणि लहान धरणातील पाणीसाठयाची व भूजल पातळी कमी झाल्याबाबत

**(२६) * ६२५४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील मध्यम आणि लहान धरणातील पाणी साठयाची व भूजल पातळीची परिस्थिती गंभीर असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील ७५ मध्यम प्रकल्पांपैकी ३५ प्रकल्प कोरडे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ४० प्रकल्पांमध्ये खूप कमी पाणीसाठा शिल्लक असल्यामुळे उन्हाळयामध्ये तीव्र पाणी टंचाई जाणवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तीव्र पाणी टंचाईमुळे दुष्काळजन्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. मराठवाडयातील ७५ मध्यम प्रकल्पापैकी २० मध्यम प्रकल्प कोरडे पडले आहेत.

(३) अंशत: खरे आहे. मराठवाड्यातील उर्वरित ५५ मध्यम प्रकल्पांची पाणी साठा स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | उपयुक्त जलसाठा टक्केवारी | प्रकल्प संख्या |
|---|---|---|
| १) | ५० % पेक्षा जास्त पाणीसाठा | ४ |
| २) | २५ ते ५० % पाणीसाठा | १२ |
| ३) | २५ % पेक्षा कमी पाणीसाठा | २६ |
| ४) | जोत्याखालील पाणीसाठा | १३ |
| | **एकूण** | **५५** |

(४) संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पाण्याचे आरक्षणा प्रमाणे पाणी वापरण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नेरळ (जि.रायगड) येथील अवैध वृक्षतोड करणा-यांवर आणि वन अधिका-यांवर शासनाने करावयाची कारवाई**

**(२७) * ६१८५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (जि.रायगड) येथील माथेरान इको-झोनमधील लव्हाळीवाडीतील संरक्षित वनाची १०० हून अधिक वृक्ष तोड करण्यात आली असतानाही वनविभागाने अद्यापपर्यंत कोणावरही कारवाई केली नसल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वृक्षतोड करणा-यांना पाठींबा देणाऱ्या वन अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) लव्हाळीवाडी ता. कर्जतमधील खाजगी मा.स.न. १२८/३ मध्ये खातेदार श्री. अनंता बापू हिंदोळा (रा.टपालवाडी) यांनी खैर वृक्षाची विनापरवाना तोड केल्याचे दिनांक २१.१२.२०१४ रोजी निदर्शनास आले आहे. सबब श्री. अनंता बापू हिंदोळा यांच्याकडून विना परवाना तोड केलेल्या १४ खैर वृक्ष २ घ.मी. वजनाचा माल जप्त करुन नेरळ फॉरेस्ट चौकी येथे जमा केला आहे. तसेच श्री. हिंदोळा यांच्याकडून दंडाची रु. २५५०/- इतकी रक्कम वसूल केली आहे.

(२) व (३) सदर झालेली वृक्षतोड ही शासकीय वन जमीनीवर नाही. वृक्षतोड करणा-या संबंधीत व्यक्तींवर नियमानुसार कारवाई केली असल्याने वन अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयातील सुरक्षारक्षकांना ६ महिन्यांचे वेतन अदा करण्याबाबत**

**(२८) * ४५११ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयात सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या सुरक्षारक्षकांना माहे जुलै, २०१४ रोजीपासून वेतन अदा केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सहा महिन्यांपासून वेतन अदा न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे. जिल्हा रुग्णालय, अलिबाग, रायगड येथील १३ सुरक्षा रक्षकांचे माहे सप्टेंबर, २०१४ ते माहे फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंतचे मानधन अनुदाना अभावी प्रलंबित आहे.
(३) व (४) जिल्हा रुग्णालय, अलीबाग, रायगड येथील १३ सुरक्षा रक्षकांचे मानधन अदा करण्याकरीता अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**वणी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील जगदंबा माता देवस्थानास 'ब' दर्जा तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत**

**(२९) * ६०६९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील जगदंबा माता देवस्थानास 'ब' दर्जा तीर्थक्षेत्र म्हणून दर्जा मिळावा, अशी मागणी स्थानिक भाविक व जनतेकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वणी येथील जगदंबा माता देवस्थानाचे धार्मिकदृष्ट्या असलेले महत्व विचारात घेता ह्या देवस्थानास 'ब' दर्जा तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) सदर तीर्थक्षेत्रास ''ब'' वर्ग दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून मागविण्यात आला आहे सदर प्रस्ताव प्राप्त होताच राज्य निकष समितीच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय सेवेतील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची कामे कंत्राटी पद्धतीने करून घेण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(३०) * ५३९० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन कर्जाच्या भाराने शासकीय सेवेतील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची कामे कंत्राटी पद्धतीने बाह्य यंत्रणेमार्फत करून घेण्याचे ठरविले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वेतन व निवृत्ती वेतनावरील खर्च कमी करण्यासाठी राज्य शासनाने आता सरकारी सेवेतील कामांचे कंत्राटीकरण करण्याचा मार्ग स्वीकारला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे मागासवर्गीय समाजावर अन्याय होणार असल्याने हा निर्णय शासन बदलणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) राज्याचा वेतनावर अंदाजे रु. ७३४३८ कोटी व निवृत्तीवेतनावर रु. १९९२९ कोटी वार्षिक खर्च होतो. मनुष्यबळाचे कायम दायित्व निर्माण न करता, प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सहजरीत्या जी कामे बाह्यंत्रणेकडून घेता येतील. अशी कामे बाहययंत्रणेकडून करुन घेण्याच्या सूचना प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत. तथापि प्रकरणपरत्वे आवश्यकतेनुसार नियमित पदनिर्मितीही केली जाते. एकंदरित नियमित पध्दतीने कर्मचारी घेण्याच्या तुलनेत बाहययंत्रणेकडून कामे करुन घेण्याचे प्रमाण अल्प आहे.

(३) सदर निर्णय सर्वांसाठी असल्याने, मागासवर्गीय समाजावर अन्याय होणार नसल्याने, हा निर्णय बदलण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ वनवृत्तासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीस मंजूर केलेला १० कोटीची निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३१) * ५६१६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ वनवृत्तासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीस मंजूर केलेला १० कोटीचा निधी शिल्लक असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा अखर्चित निधी जिल्ह्यातील विकास कामांसाठी खर्च करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर येथील रेंजर वसाहत कॉलनीत लावण्यात आलेले सोलर लाईट**

**(३२) * ५१३६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथील रेंजर वसाहत कॉलनीत २५ लाख रुपये खर्च करुन १०० सोलर लाईट लावण्यात येवून त्यापैकी ४ ते ५ लाईट सुरु असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने त्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.